# प्रेस नोट

## ओपन नॅशनल स्पोर्टस् चॅम्पीयनशीप आर्चरी स्पर्धा - २०२१ मडगाव, गोवा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघाने पदकांची केली लयलूट

## (५ सुवर्ण, ४ रौप्य व ४ कांस्य पदक)

दि.८ ते १० ऑक्टोंबर २०२१ या कालावधीमध्ये ओपन नॅशनल स्पोर्टस् चॅम्पीयनशीप आर्चरी स्पर्धा - २०२१ मडगाव, गोवा येथे पार पडली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघाने सहभाग नोंदवून खालील प्रमाणे पदकांची लयलुट केली आहे.




| अ.क्र. | खेळाडूचे नाव | नेमणुक | प्रकार | कामगिरी |
|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/ भागुबाई बल्लाळ | वाशिम | कंपाऊंड ५० मी | सुवर्ण पदक |
| २ | मपोशि/ रेखा लांडकर | वाशिम | कंपाऊंड ५० मी | रौप्य पदक |
| ३ | मपोशि/४३२, सिमा दुबे | वर्धा | कंपाऊंड ५० मी | कांस्य पदक |
| ४ | पोशि/ आकाश उदुगुडे | मुंबई शहर | कंपाऊंड ५० मी | सुवर्ण पदक |
| ५ | पोशि/३००, प्रसाद बोरकर | रा.रा.पो.बल गट क्र. २, पुणे | कंपाऊंड ५० मी | रौप्य पदक |
| ६ | पोशि/पांडुरंग गजे | औरंगाबाद शहर | कंपाऊंड ५० मी | कांस्य पदक |
| ७ | पोशि/३२६, विवेक तरोणे | रा.रा.पो.बल गट क्र. ९, अमरावती | रिकर्व्ह ७०. मी | सुवर्ण पदक |
| ८ | पोशि/६९५३, अनिल पाटील | पुणे शहर | रिकर्व्ह ७०. मी | कांस्य पदक |
| ९ | पोशि/१९७, दिगंबर चव्हाण | रा.रा.पो.बल गट क्र. १०, | इंडियन ५०. मी | सुवर्ण पदक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सोलापूर | | |
| १० | पोशि/३२९, रोहन शिंदे | रा.रा.पो.बल गट क्र. १, पुणे | इंडियन ५०. मी | रौप्य पदक |
| ११ | मपोउनि/अनुराधा पाटील | ल वि १, मुंबई शहर | इंडियन ३०. मी | सुवर्ण पदक |
| १२ | मपोशि/१३५७, रोहिणी जानराव | सोलापूर ग्रामीण | इंडियन ३०. मी | रौप्य पदक |
| १३ | मपोशि/सुप्रिया गोडबोले | नांदेड | इंडियन ३०. मी | कांस्य पदक |

ओपन नॅशनल स्पोर्टस् चॅम्पीयनशीप आर्चरी स्पर्धा - २०२१, मडगाव, गोवा स्पर्धेमधील जवळ जवळ सर्व प्रकारामध्ये महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघाने आपले वर्चस्व निर्माण करीत पदके प्राप्त केली आहेत.

कोरोना - १९ या महामारीच्या मुळे सरावामध्ये खंड पडून सुध्दा आणि कोरोनो नियमांचे काटेकोर पणे पालन करुन आपल्या सरावामध्ये सातत्य राखून सदर खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. सरावामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये खंड पडून सुध्दा खेळाडूंनी सरावामध्ये सातत्य राखून पुर्नआगमण केले आहे. आमागी होणारी १०वी अखिल भारतीय पोलीस आर्चरी स्पर्धा - २०२१ साठी महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघाची जोरदार तयारी सुरु आहे. सहा. प्रशिक्षक/ समन्वयक पोह/१४२, सुरेश शिंदे - रा.रा.पो.बल.गट.८ गोरेगाव, मुंबई यांनी खेळाडूंकडून उत्कृष्ठ प्रकारे सराव घेवून वेळोवळी त्यांना प्रोत्साहन केले. सदर आर्चरी खेळाडू प्रशिक्षणार्थी साठी आज प्रेरणादायी ठरत आहे.

महाराष्ट्र पोलीस आर्चरी संघास श्री. संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. अनुप कुमार सिंग, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, सहाय्यक क्रीडा अधिकारी श्री. जुनेद खान, आणि सहा.प्रशिक्षक/समन्वयक - सुरेश शिंदे, यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करुन खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहिल असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत.

Junaid Khan 21/10/2021.

(जुनेद खान)
सहाय्यक क्रीडा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पोलीस, मुंबई.